INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# शिरपूर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या संगणक विषयक अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास

# (Comparative Study of Computer aptitude of Secondary and Higher Secondary School Teachers in Shirpur Taluka)

**डॉ. पुराणीक विजेंद्र श्रीकृष्ण**
सहाय्यक प्राध्यापक
आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
शिरपूर, जि. धुळे

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/05.2022-23772197/IRJHIS2205022

**प्रस्तावना :**

संगणक शिक्षण क्षेत्रातील उपयोग अतिशय महत्वाचा आहे. विद्यार्थ्यांना ज्ञान देण्यासाठी तसेच शिक्षकाला स्वत:च्या ज्ञानात भर घालण्यासाठी संगणकाचा उपयोग होतो. संगणकाचे ज्ञान प्रत्येक शिक्षकाला असणे गरजेचे आहे. शिक्षकामध्ये असणाऱ्या काही उणीवा संगणकाद्वारे भरल्या जावू शकतात. शिक्षकांना संगणकाचे परिपूर्ण ज्ञान असेल तर निश्चितच त्याचा फायदा सर्व विद्यार्थ्यांना होतो. आज संगणकामुळे संपुर्ण जग हे जवळ येण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे नवनवीन माहिती घेणे हे आवश्यक झाले आहे. या युगात वावरायचे असेल तर संगणकाचे ज्ञान आवश्यक आहे. संगणकामुळे काही विशिष्ट घटक विद्यार्थ्यांना विविध प्रकारची चित्रफित दाखवून, दृष्ये दाखवून त्यांचे ज्ञानदान करता येते. संगणक शिक्षणामुळे अभ्यासक्रम योग्य रितीने पार पाडणे शक्य होते. यातुन संगणक शिक्षण शाळेत दिले जाणे महत्वाचे ठरते. कारण आजच्या स्पर्धात्मक युगात सर्व विद्यार्थ्यांना योग्य रितीने मार्गदर्शन मिळावे या दृष्टीने संगणकाचा वापर करणे आवश्यक ठरते.

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. संगणक शिक्षणाची आवश्यकता आज सर्वच स्तरावर गरजेची आहे. शिक्षक हा विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याचे कार्य करतो. जर शिक्षकाला या संदर्भांत माहिती कमी असेल तर त्याच्या अध्यापनाचा विद्यार्थ्यांना उपयोग होणे शक्य नाही. बऱ्याच शिक्षकांमध्ये संगणाकाविषयी उदासिनता दिसुन येते. नवीन गोष्टी आत्मसात करणे, शिणे याकडे लक्ष न देता ते अशा गोष्टीपासुन दूर राहतात. विद्यार्थी हा उद्याचा भावी नागरीक असल्यामुळे त्याला संगणकाचे ज्ञान असणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांना ज्ञान मिळावे यासाठी शिक्षकाला संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक ठरते. म्हणून संगणकाच्या ज्ञानाची शिक्षकाला आवश्यकता

आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरुष शिक्षकांच्या संगणकाविषयी दृष्टीकोन जाणुन घेण्यासाठी व त्याच्यातील फरक पाहण्यासाठी संबंधित संशोधन अभ्यास करण्याचे संशोधकाने निश्चित केले आहे.

**संशोधनाची गरज :**

आजच्या आधुनिक काळात तंत्रज्ञानाने ज्ञानाच्या आकाशात झेप घेतली आहे. आज च्या काळात संगणक मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे. आज असे एकही क्षेत्र नाही की, ज्यास संगणाकाने व्यापले नाही शिक्षण, विज्ञान, अंतराळ, संरक्षण, बँकिंग तसेच सर्वच क्षेत्रात संगणकाचा उपयोग होतो.

विविध स्तरावर आज संगणकाची ओळख असणे महत्वाचे ठरते. त्यासाठी विविध सरकारी उपक्रम आहेत. MS-CIT, MS- Office, DTP, TALLY, JAVA यासरख्या Class च्या माध्यमातुन संगणाक शिक्षण देण्याची प्रेरणा देण्यात येत आहे.

भारतीय संस्कृतीत शिक्षकाला अनन्य साधारण असे महत्वाचे आहे. समाज घडविण्याची जबाबदारी शिक्षकाची आहे. म्हणून शिक्षकाकडे बघण्याचा दृष्टीकोन सगळयांचा वेगळा आहे. विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देण्यासाठी शिक्षकाला संगणकाचे सखोल ज्ञान असणे गरजेचे आहे. जर शिक्षकाला संगणकाविषयी अभिवृत्ती नसेल तर तो संगणकाच्या ज्ञानाच्या बाबतीत मागे राहतो. तसेच या सर्व परिस्थितीत तो स्वत:ला संगणक शिक्षणायोग्य मानत नाही संगणकाविषयी अज्ञान असल्यामुळे ते इतरांपेक्षा स्वत:ला कमी लेखतील पर्यायाने विद्यार्थ्यांचा विकास होणार नाही. म्हणून या संदर्भात संगणक शिक्षण गरजेचे आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्राचा भावी नागरिक घडत आहे. शिक्षणामुळेच समाजाचा विकास होत आहे. विद्यार्थ्यांपर्यंत विविध प्रकारची माहिती शिक्षक शिक्षणाच्या माध्यमातुन पोहचवतात. शिक्षकांना शिकविण्यात किंवा अध्ययन पद्धतीत मदतीची महत्त्वाची भुमिका संगणकाच्या माध्यमातुन पार पाडली जातांना आपणास दिसुन येते. त्यासाठी शिक्षण क्षेत्रात संगणक प्रशिक्षणाला महत्त्व आहे.

संगणकाच्या या युगात ज्ञानाचा फार मोठा प्रस्फोट झालेला आहे. राष्ट्राचा, जगाच्या कोणत्याही ठिकाणी लागलेला शोध, तेथील ज्ञान काही क्षणात संगणक व इंटरनेटच्या माध्यमातून आपणास प्राप्त होत असते. नवनविन ज्ञान मिळविणे व आपले ज्ञान अद्यावत ठेवणे हे शिक्षकांसाठी अत्यंत महत्वाचे आहे. इंटरनेटद्वारे असे उद्ययावत ज्ञान मिळविण्यासाठी संगणक प्रशिक्षण महत्वाचे आहे.

1. प्रस्तुत संशोधनातुन संगणक अभिवृत्तीचे मापन करण्यासाठी महत्त्वाचे आहे.
2. प्रस्तुत संशोधनातुन माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या संगणक विषयक अभिवृत्तीचा अभ्यास करुन त्यांच्या प्रात्यक्षिक कार्याची पुर्नरचना करण्यासाठी महत्वाचे आहे.
3. कमी अथवा अप्रगत अभिवृत्ती असणाऱ्या शिक्षकांना प्रेरणा व प्रोत्साहन देण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्तवाचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

प्रस्तूत संशोधनासाठी खालील प्रमाणे उद्दिष्टे ठरवलेली होती.

1) शिरपुर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या संगणक विषयक अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2) शिरपुर तालुक्यातील उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या संगणक विषयक अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3) शिरपुर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या संगणक विषयक अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**संशोधनाची परिकल्पना :**

संशोधनाची उद्दिष्टे लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधनासाठी पुढील परिकल्पना मांडल्या आहेत.

1) शिरपुर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरुष शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
2) शिरपुर तालुक्यातील उच्च माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरुष शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
3) शिरपुर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीच्या मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**संज्ञाच्या कार्यात्मक व्याख्या :**

प्रस्तुत संशोधनात संशोधकानेे पुढील कार्यात्मक व्याख्या केल्या आहेत.

1) **शिरपुर तालुका :** संशोधकाने संशोधनासाठी निवडलेले ठिकाण म्हणजे शिरपुर तालुका होय.
2) **माध्यमिक शिक्षक :** संशोधकाने संशोधनासाठी निवडलेले इ.5 वी ते 10 वी च्या वर्गांला अध्यापनाचे कार्य करणारे शिक्षक
3) **उच्च माध्यमिक शिक्षक :** संशोधकाने संशोधनासाठी निवडलेले इ.11 वी ते 12 वी च्य वर्गांला अध्यापनाचे कार्य करणारे शिक्षक
4) **संगणक अभिवृत्ती :** Dr. Tahir khatoon व Manika Sharma यांनी प्रमाणित केलेल्या संगणक अभिवृत्ती चाचणीला माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना मिळविले गुणांक म्हणजे संगणक अभिवृत्ती होय.

**व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती व मर्यादा पुढील प्रमाणे :

1. प्रस्तुत संशोधनात शिरपूर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत अध्यापनाचे कार्य करणाऱ्या 140 शिक्षकांचा समावेश करण्यात येईल.

2. प्रस्तुत संशोधनात शहरी व ग्रामीण शाळा असा विचार केला जाणार नाही.

**संशोधन पध्दती :**

सदर संशोधनात संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग केला आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीची वर्तमान स्थिती जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण पद्धती उपयुक्त असल्याने संशोधकाने ही पद्धत निवडलेली आहे.

**जनसंख्या :**

प्रस्तुत संशोधनातील जनसंख्या शिरपूर तालुक्यातील 1600 एवढी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांची जनसंख्या म्हणून निश्चित करण्यात येईल.

**न्यादर्श / नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनासाठी एकूण जनसंख्येच्या 1600 पैकी 9% म्हणजे 140 एवढा न्यादर्श स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने करण्यात येईल.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ :**

1. **शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळुन येत नाही.**

**तक्ता क्रं. 1**

**शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीचे मध्यमान (M), प्रमाणविचलन (SD) व 't' मूल्य.**

| माध्यमिक शाळा | संख्या (N) | मध्यमान | प्रमाणविचलन | नमुना 't' | प्राप्त 't' | त्याग / स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| स्त्री शिक्षक | 35 | 75.62 | 11.01 | 2.00 | 0.15 | स्वीकार |
| पुरूष शिक्षक | 35 | 76.05 | 12.40 | | | |

df = 68 साठी 0.05 सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य 2.00 आहे व प्राप्त 't' मूल्य 0.15 असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

**02 - शिरपूर तालुक्यातील उच्चमाध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्रं. 2**

**उच्चमाध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीचे मध्यमान (M), प्रमाणविचलन (SD) व 't' मूल्य.**

| उच्चमाध्यमिक शाळा | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | नमुना 't' | प्राप्त 't' | त्याग /स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| स्त्री शिक्षक | 35 | 79.97 | 12.04 | 2.00 | 1.51 | स्वीकार |
| पुरूष शिक्षक | 35 | 73.11 | 11.33 | | | |

df = 68 साठी 0.05 सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य 2.00 आहे व प्राप्त 't' मूल्य 1.51 असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

**03- शिरपूर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्रं. 3**

**माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीचे मध्यमान (M), प्रमाणविचलन (SD) व 't' मूल्य.**

| शिरपूर तालुका | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | नमुना 't' | प्राप्त 't' | त्याग / स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| माध्यमिक शाळा | 70 | 75.84 | 11.64 | 1.98 | 0.35 | स्वीकार |
| उच्च माध्यमिक शाळा | 70 | 76.54 | 12.11 | | | |

df = 138 साठी 0.05 सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य 1.98 आहे व प्राप्त 't' मूल्य 0.35 असून ते नमुना 't' पेक्षा कमी आहे. म्हणुन शुन्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

**निष्कर्ष :**

मिळविलेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

1) माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांची संगणक अभिवृत्ती समान आहे.
2) उच्च माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांची संगणक अभिवृत्ती समान आहे.
3) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांची संगणक अभिवृत्ती समान आहे.

**संदर्भ सुची :**

1. पंडीत बन्सी बिहारी, शिक्षणातील संशोधन, नित्य नूतन प्रकाशन पुणे (2005).
2. पंडीत बन्सी बिहारी व सुरवाडे लता, शिक्षकांच्या संगणक अभिवृत्तीचा अभ्यास, शिक्षण समिक्षा (ऑक्टो-नोव्हें 2005).
3. Journal at all India Assocation for education receard volume (132 No.182)

4. www.utexas.edu.com,
5. कदम चा. प., शैक्षणिक संख्याशास्त्र, नुतन प्रकाशन, पुणे (1989).
6. भिंतांडे वि.रा., शैक्षणिक संशोधन पद्धती : (तिसरी आवृत्ती) नुतन प्रकाशन, पुणे (1999).
7. मुळे रा.श. आणि उमाठे वि. तु., शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे (द्वितीय आवृत्ती), विद्या प्रकाशन, औरंगाबाद (1987).